K. S. Wani Memorial Trust
NEWS LETTER
Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.22 / July - September 2023 / K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

Printing Institute News



सर्व मान्यवर वाचकांना
विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा



द्वितीय वर्ष मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची दै. पुण्यनगरी येथे औद्योगिक सहल

द्वितीय वर्ष मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वेब मुद्रण पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी स्थानिक वृत्तपत्र दै. पुण्यनगरी येथे ०५ ऑक्टोबर रोजी रात्री औद्योगिक सहलीचे आयोजन करण्यात आली होते सुमारे ३५ विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन त्यांना दै. पुण्यनगरीचे उत्पादन प्रमुख श्री. सिंग साहेब व व्यवस्थापक श्री. थोरात साहेब यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. औद्योगिक सहलीला निर्देशक श्री. राजाराम वांजळे व निर्देशक श्री. निलेश पाटील यांच्यासह मुद्रण शिक्षण विभाग प्रमुख श्री. प्रसाद पुराणिक हे उपस्थित होते .



विद्यार्थ्यांची दै. पुण्यनगरी येथे भेट

स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

देशाला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्षे पूर्ण झालीत नुकताच स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव संपूर्ण देशात साजरा करण्यात आला. आपल्या संस्थेत देखील १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी संस्थेचे विश्वस्त मा. श्री श्रीपाल मुणोत यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्र ध्वजाला मानवंदना देण्यात आली. या वेळी संस्थेचे विश्वस्त श्री. जितेंद्र सोनगिरे व संस्थेचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते .



ध्वजारोहण सोहळ्यात उपस्थित का. स. वाणी संस्था, बालनेत्र सुरक्षा प्रकल्प व
रेऊ वाणी विज्ञान विहारचे सर्व कर्मचारी व पदाधिकारी.

गणेशोत्सवानिमित्त सत्यनारायण महापूजा व स्नेहभोजनाचे आयोजन



संस्थेच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या उत्पादन विभागात सालाबादाप्रमाणे यावर्षी देखील श्री गणेशोत्सव अतिशय आनंदी व भक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शाळूमातीची पर्यावरणपूरक मूर्तीची या वेळी प्रतिष्ठापना करण्यात. आली श्री. गणेशोत्सवानिमित्त सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले व त्याच दिवशी संस्थेतील सर्व कर्मचारी बांधवांसाठी सहकुटुंब सहपरिवार स्नेहभोजनाचे आयोजन संस्थेच्या मुख्य शाखेत संध्याकाळी करण्यात आले होते.



ग्राफिक डिझायनिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रम व मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रम वर्गांचे मान्यवरांच्या हस्ते उदघाटन

शैक्षणिक वर्ष २०२३ – २४ मध्ये प्रवेशित नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत व Certificate Course in Graphic Designing वर्गाच्या III Batch चे उद्घाटन करण्यासाठी क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील आजीवन अभ्यास केंद्राचे संचालक मा. प्रा. डॉ आशुतोष पाटील व आपल्या संस्थेचे विश्वस्त प्रा. डॉ. न.म. जैन यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. ग्राफिक डिझायनिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मिळत असलेले यश पाहून मा. प्रा. डॉ. आशुतोष पाटील यांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमात पालेशा महाविद्यालयातील ई. कॉमर्स शाखेचे प्रमुख प्रा. प्रशांत बडगुजर यांचे प्रिंटींग व पॅकेजिंग क्षेत्रातील संधी या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पदविका अभ्यासक्रमात शिकत असलेल्या दोन्ही वर्गांच्या विद्यार्थ्यांना व ग्राफिक डिझायनिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.डॉ. आशुतोष पाटील

मुद्रण शिक्षण संस्थेत शिक्षकदिन साजरा

भारताचे माजी राष्ट्रपती व तत्वज्ञानाचे प्राध्यापक व ख्यातनाम विचारवंत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा वाढदिवस देशात राष्ट्रीय शिक्षकदिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी मुद्रण शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन आदर व्यक्त केला. या प्रसंगी संस्थेचे ग्रंथपाल श्री. मिलिंद दीक्षित यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या धुळे शहराशी संबंधित आठवणी सांगितल्या. मुद्रण शिक्षण विभाग प्रमुख प्रा प्रसाद पुराणिक यांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला



विद्यार्थ्यांची यशोगाथा

मी मयुर राजेंद्र कुंभार मूळचा मुडी (बोदर्डे) ता. अमळनेर, जि. जळगाव या गावचा रहिवासी आहे. माझे वडील शेती करतात अल्पभूधारक असल्याने जोडधंदा म्हणून पिठाची गिरणी हा व्यवसाय देखील करतात आई गृहिणी आहे दोन बहिणी असून मोठी बहीण विवाहित आहे, तर लहान बहीण शिक्षण घेत आहे.

माझे बारावी पर्यंत शिक्षण झाल्यानंतर वडिलांनी शहरात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यास असमर्थता दर्शविली कारण ते जेमतेम परिस्थितीमुळे उचलून पैसे देऊ शकत नव्हते पण त्यांनी मला अप-डाऊन करुन धुळे किंवा अमळनेर येथे शिक्षण घेण्यास परवानगी दिली. माझ्या मित्राने मला संस्थेत शिकविल्या जाणाऱ्या मुद्रण तंत्र पदविका अभ्यासक्रमाची माहिती दिली मी पूर्ण चौकशी करून माझ्या वडिलांना प्रवेश घेण्यास तयार केले. फी वाजवी असली तरी माझ्यासाठी ती जास्तच होती पण माझ्या वडिलांनी सरांना विनंती केली व हप्त्याने फी आकारली जात असल्याचे ऐकून माझे वडील आनंदित झाले. मी २०१९-२० मध्ये पदविका अभ्यासक्रम यशस्वी रित्या पूर्ण केला त्यानंतर भारतात दोन वर्षे नोकरी केली फक्त दोन वर्षाच्या अनुभव असतांना मला Hot pack packaging Ltd., Dubai (UAE) या कंपनीत नोकरी करण्याची संधी चालून आली. महिना ६५०००/- ₹ वेतन देणार असल्याने मी जाण्याचे ठरविले. माझे परदेश प्रवासाचे स्वप्न पूर्ण झाले या ठिकाणी माझे Senior भाग्येश सर यांनी खूप मार्गदर्शन केले व त्यांच्या सहकार्यामुळे मी दहा महिन्यांपासून दुबईत कार्यरत आहे . माझ्या आजोबांनी हलाखीच्या परिस्थितीमुळे विकलेली शेती मी परत विकत घ्यावी अशी माझ्या आई वडिलांची इच्छा होती ती मी पूर्ण करू शकलो ते केवळ संस्थेत घेतलेल्या शिक्षणामुळे. आमचा सर्व परिवार संस्थेचे या माध्यमातून आभार व्यक्त करतो !

आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा आयोजित

का. स. वाणी संस्था विद्यार्थी रेड रिबन क्लब व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त सामाजिक विषयांवर जनजागृतीपर पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी समुपदेशक श्रीमती अहिरराव यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना युवकांची कर्तव्ये व आंमली पदार्थ विरोधात तत्पर असण्या बाबत शपथ देण्यात आली. पोस्टर स्पर्धेत सुमारे तीस विद्यार्थी सहभागी झाले होते त्यातून शैलेश पाटील या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याच्या पोस्टरला प्रथम क्रमांक देऊन पुढील स्पर्धेसाठी निवडण्यात आले.



शपथ घेताना शिक्षक व विद्यार्थी

रेऊ वाणी विज्ञान विहार

रेऊ वाणी विज्ञान विहाराची प्रवेश परिक्षा

दिनांक २ जुलै 2023 रोजी रेऊ वाणी विज्ञान विहाराची प्रवेश परीक्षा घेण्यात आली सदरप्रवेशिकेसाठी ६२४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १२० विद्यार्थ्यांना प्रयोग वर्गासाठी प्रवेश देण्यात आला.



आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर मार्गदर्शन

दि. 30 जुलै 2023 रोजी रेऊ आणि विज्ञान विहाराच्या विद्यार्थ्यांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर मा.डॉ. संतोष बिरारी यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. या मार्गदर्शनात भविष्यात आर्टिफिशल इंटेलिजन्स चे स्वरूप काय असू शकते . त्याचे भविष्यातील फायदे तोटे व करिअर निवडताना घ्यावयाची सावधगिरी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.



मार्गदर्शन करतांना डॉ.संतोष बिरारी

स्व.डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या जन्मदिनांनिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दिनांक 10 सप्टेंबर 2023 रोजी स्व.डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या जन्मदिनांनिमित्त रेऊ वाणी विज्ञान विहाराच्या विद्यार्थ्यांसाठी प्रयोगातून गणित या विषयावर मा. डॉ. एन. एम. जोशी यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते जोशी सरांनी धुळ्यातील गणितज्ञ या विषयावर पुस्तकही लिहिले आहे. त्यात डॉ. जगन्नाथ वाणी यांचा ही समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी त्यांनी डॉ.वाणी कडून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी गणितात रुची वाढवण्यासाठी प्रयत्न करावा हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.



गणपती बनवण्याची कार्यशाळा

दि. १४ सप्टेंबर २०२३ रोजी विज्ञान विहारातील विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण पूरक शाळू मातीचा गणपती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली.



गणपती बनवण्याची कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी बनविलेले गणपती

बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

उन्हाळी सुटी नंतर नेत्रतपासणीचे काम जोमाने सुरु झाले.इनरव्हील क्लब ऑफ चाळीसगाव व रोटरी क्लब ऑफ चाळीसगाव यांनी आयोजित केलेल्या शाळांमध्ये नेत्रतपासणी सुरु आहे जुलै ते सप्टेंबर २०२३ दरम्यान एकूण २६१८५ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली . तपासणी दरम्यान १३३३ विद्यार्थी रेफर करण्यात आले, त्यापैकी १६५ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले तसेच आतापर्यंत ११४ विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्यात आले.



इनरव्हील क्लब ऑफ चाळीसगाव

जुलै ते ऑगस्ट या दरम्यान इनरव्हील क्लब ऑफ चाळीसगाव तर्फे आयोजित प्रकल्प प्रमुख सौ. कल्पनाताई धामणे व इनरव्हील क्लब ऑफ चाळीसगाव च्या अध्यक्षा डॉ. शुभांगी पूर्णपात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र तपासणी शिबिरामध्ये एकूण ३५ शाळांमध्ये १६०८६ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ९४४ विद्यार्थ्यांना रेफर करण्यात आले, त्यामध्ये ८७ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले व १११ विद्यार्थ्याना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

प्रकल्पाच्या कामाचे कौतुकाची पावती म्हणून इनरव्हील क्लब च्या प्रेसिडेंट सौ. शुभागी पूर्णपात्रे व डीस्ट्रीक प्रेसेंडेट श्रीमती देशमुख यांच्या तर्फे संपूर्ण प्रकल्प सदस्यांचा सन्मान चिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.



बालनेत्र सुरक्षा प्रकल्पा अंतर्गत मोफत चष्मा वाटप

बालनेत्र सुरक्षा प्रकल्पा अंतर्गत इनरव्हील क्लब आयोजित नेत्र तपासणीत चष्मा नंबरची गरज असणाऱ्या ११४ विद्यार्थ्यांना गाडीत चष्मा नंबर काढून दिला व त्या विद्यार्थ्यांना प्रकल्पा अंतर्गत मोफत चष्मे वाटप करण्यात आले. गाडीत नेत्र तपासणी करताना ज्या विद्यार्थ्यांना विशेष उपचाराची गरज आहे अशा विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालयात रेफर करण्यात आले .



रोटरी क्लब ऑफ चाळीसगाव

१ सप्टेंबर २०२३ पासून ते आजतागायत रोटरी क्लब ऑफ चाळीसगाव तर्फे आयोजित प्रकल्प प्रमुख आणि रोटरी क्लब ऑफ चाळीसगाव चे अध्यक्ष मा. श्री भैय्यासाहेब ब्रिजेश पाटील सर तसेच मा. शशिकांत धामणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आत्तापर्यंत ४४ खेड्यांमध्ये एकूण ४६ जिल्हा परिषद शाळा, १४ माध्यमिक विद्यालय व ३ आश्रम शाळांमध्ये ८२६६ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली त्यापैकी २६६ विद्यार्थ्यांना रेफर करण्यात आले व ७४ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले.



धुळे येथील शाळांमध्ये १८३३ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी १२३ विद्यार्थ्यांना रेफर करण्यात आले व ४ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले. तसेच ३ विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्यात आले.



दरवर्षी नवीन येणा-या विद्यार्थ्यांमध्ये नेत्रदोष असल्यास ते कसे ओळखावे, डोळ्यांचे विविध आजार , डोळ्यांची काळजी कशी घ्यावी इत्यादि बाबत शिक्षकाना माहिती मिळावी यासाठी प्रकल्पातर्फे व्हिजन चार्ट व माहिती पुस्तिकेचे मोफत वाटप करण्यात येत आहे.



व्हिजन चार्ट व माहिती पुस्तिकेचे मोफत वाटप व मार्गदर्शन करतांना


तपासणी अहवाल तक्ता

	जुलै ते सप्टेंबर २०२३	३० सप्टेंबर २०२३ पर्यंत
Screened	२६१८५	५८५६९
Spect (School Camp)	११४	१३३
Refer (School)	१३३३	३३२७
Visited	१६	५०१
Surg. Suggested	२	४५
Surg. done	४	३१
G.P. given (S.N.)	६	२६४
Higher Centre	०	१०
Patch	१	२६
Cornea / Retina	०	०५
Follow Up / medicine given	२	९७

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था उपक्रम

पीएच. डी. मार्गदर्शकांची झूम मिटिंग संपन्न

सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार संशोधन कार्यात आधुनिक बदल घडवून आणावेत, प्रादेशिक साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवनवीन विषयात संशोधन करता यावे, तसेच का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन केंद्रात जास्तीत जास्त संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद व्हावी या हेतूने संस्थेचे मानद संचालक प्रा. डॉ. वंदना महाजन यांच्या अध्यक्षतेखाली संशोधक मार्गदर्शकांसाठी दि. १० सप्टेंबर २०२३ रोजी झूम मिटिंग आयोजित करून मुक्त संवाद साधला. संस्थेचे समृद्ध ग्रंथालय संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संस्थेतून संशोधन कार्य करणे सोयीचे होईल अशी भावना सर्वानुमते व्यक्त करण्यात आली. पीएच. डी. मार्गदर्शकांचा सोशल मिडीयावर ग्रुप करण्यात यावा असे ठरले सदर बैठकीस प्रा.डॉ किशोर पाठक, प्रा.डॉ वाल्मिक आढावे, प्रा.डॉ शारदा मोरे, श्री. मिलिंद दीक्षित, श्री सुनील देसले आदी उपस्थित होते.



झूम मिटिंग मध्ये सहभागी मान्यवर

‘सा’ संस्थेत रक्षाबंधन सण साजरा

बहीण भावाच्या पवित्र नात्याची वीण घट्ट करणारा रक्षाबंधन अर्थात नारळी पौर्णिमा हा सण ‘सा’ संस्थेत अनेक वर्षांपासून साजरा करण्यात येतो आहे यावर्षी देखील सर्व शुभंकर व ‘सा’ परिवारातील सदस्य यांना भावा बहिणींच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.





‘सा’ संस्थेत स्वातंत्र्य दिन साजरा

‘सा’ संस्था पुणे च्या कमलिनी कृती भवन या इमारतीत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला यावेळी ‘सा’ संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'सा' संस्थेत केअरगिव्हर्स 'डे' साजरा



दरवर्षी पुणे येथील सा संस्थेमध्ये मा. डॉ. जगन्नाथ वाणी यांचा वाढदिवस केअरगिव्हर्स 'डे' म्हणून साजरा करण्यात येतो या वर्षी देखील ११ सप्टेंबर रोजी मा. डॉ. वाणी यांच्या जन्मदिनी रविवार असल्याने १० सप्टेंबर रोजी संपूर्ण दिवसभर विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले यात मानसिकदृष्ट्या आजारी असलेल्या कौटुंबिक काळजीवाहकांशी संबंधित समस्यांवर पाच व्यवसाय सत्रे झालीत. प्रत्येक सत्रात तीन पॅनेलिस्ट आणि एक नियंत्रक सहभागी होते. संपूर्ण भारतातून या कार्यक्रमास पॅनेल आणि प्रतिनिधी आले होते. अनेकांनी हा कार्यक्रम ऑनलाइन पाहिला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून 'सा' च्या मिशन ग्रुपच्या ३२५ सदस्यांमध्ये महत्वपूर्ण चर्चा घडवून आणली.

शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

OPD DETAILS

Period	Paid	Review Free	Express OPD	Subsidzed	Retina OPD	Paediatric OPD	Total
1st July'23 to 30th September'23	9712	3578	413	1037	446	83	***15269***

OT DETAILS (Surgery Details)

Period	SICS Free	SICS Paid	Phaco	Retina	Other	Paediatric	Total
1st July'23 to 30th September'23	681	530	1102	65	224	14	***2616***

का. स. वाणी स्मृति प्रतिष्ठान, धुळे
विद्यमान विश्वस्तांची यादी

मा.सी.ए.श्री.शशिकांत धामणे (अध्यक्ष)
मा. प्रा.डॉ. शोभा शिंदे (सचिव)
मा. डॉ.के.बी. पाटील
मा. श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी
मा. प्रा.डॉ. नटवरलाल जैन
मा. श्री. श्रीपाल मुणोत
मा. श्री. विवेक केले
मा. श्री. जितेंद्र सोनगिरे

We accept donations from well-wishers

K.S.Wani Memorial Trust
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
IDBI Bank, Dhule (Maharashtra)

Reg. No. K.S. Wani Memorial Trust. No. E352/Dhule
FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K

Contact: K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org